# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : 24010437/ 24020781/ 24014701
फॅक्स : 24024068
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, 2/ 3/ 4 था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - 400 022.

क्रमांक : मप्रनि/सह-सं.(हप्रनि.)/ २३६९ दिनांक :२९/०५/२०१५.

प्रति,
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
औरंगाबाद/नवी मुंबई.

विषयः- दिनांक १५/०५/२०१५ रोजी मा.प्रधान सचिव तथा अध्यक्ष,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या औरंगाबाद व नवी मुंबई अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीसाठी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत..

उपरोक्त विषयाबाबतचे इतिवृत्त मा.अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ यांनी मान्य केले आहे. तरी याबाबत आपल्या कार्यालयाशी संबंधीत विभागांना/कारखान्यांना पत्राद्वारे कळविण्यात यावे व त्यासंबंधीचा कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. (सोबत इतिवृत्ताची छायांकित प्रत जोडली आहे.)

सोबतः- वरीलप्रमाणे.

२९/५/१५
( वि. मो. मोटघरे )
सह-संचालक (हप्रनि)

प्रत माहितीकरीता सादरः-
मा.सदस्य सचिव यांचे स्वीय सहायक, म.प्र.नि.मंडळ, मुंबई

सोबतः- वरीलप्रमाणे.

मा.प्रधान सचिव (पर्यावरण) तथा अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ, यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५/०५/२०१५ रोजी मंडळाच्या मुख्यालयात औरंगाबाद अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

---

दिनांक १५/०५/२०१५ रोजी झालेल्या आढावा बैठकीत उपस्थित असलेल्या अधिकारी व उद्योगांचे प्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

सभेच्या प्रस्तावनाबाबत नमुद करताना मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांच्या अहवालानुसार औरंगाबाद औद्योगिक क्षेत्र हे अतिप्रदूषित म्हणून जाहिर करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्देशांक कमी करण्याच्यादृष्टीने कृती आराखडा शासनास सादर केला होता. सदर कृती आराखडयामध्ये अल्प व दीर्घ मुदतीत प्रदूषण निर्देशांक कमी करण्याबाबतच्या उपाययोजनांचा समावेश आहे. सदर उपाययोजनेबाबत प्रभावी अंमलबजावणीची सद्य:स्थितीबाबत व त्यावर उपाययोजनाबाबत सदर बैठक घेण्यात येत आहे.

सह-संचालक (हप्रनि) यांनी कृती आराखडयाबाबतचा अहवाल विस्तृतपणे सादर करण्यात आला. सदर आराखडयामध्ये वाळुज, चिखलठाणा, शेंद्रा व रेल्वे स्टेशन या औद्योगिक क्षेत्राचा व औरंगाबाद शहराचा समावेश होतो.

सदर निर्देशांक कमी करण्यासाठी म.प्र.नि.मंडळाने कृती आराखडयाचा पाठपुरावा करुन, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या हवा, जल व भूमीमध्ये झालेल्या प्रदूषणाची तिव्रता कमी करण्यासाठी उद्योगाकडून उपाययोजना करुन घेण्यात आलेल्या आहेत. जल प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी १० एम.एल.डी.क्षमतेची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वाळुज येथे सामुहिक सांडपाणी संयंत्रणा सन-२०११ मध्ये कार्यान्वित

करण्यात आली. उद्योगामध्ये अस्तित्वात असलेल्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये सुधारणा करण्यात आल्या. हवा प्रदूषणाचा निर्देशांक कमी करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेत आवश्यक त्या सुधारणा करुन इएसपी, वेट स्क्रबर, बॅक फिल्टर्स इ.यंत्रणा बसवून व इंधनामध्येदेखील बदल करण्यात आला. उद्योगाकडून निर्माण होणा-या घातक घनकच-याची विल्हेवाट सामुहिक घातक घनकचरा प्रकल्पामध्ये करण्यात येते. सदर बैठकीमध्ये सद्य:स्थितीत वाळुज औद्योगिक क्षेत्रामध्ये असलेल्या सामुहिक सांडपाणी सांडपाणी सयंत्रणेसंबंधी असलेल्या समस्येबाबत चर्चा करण्यात आली. सद्य:स्थितीत सदर यंत्रणेमध्ये ३ ते ३.५ एम.एल.डी. सांडपाणी प्रक्रियेसाठी १३४ उद्योगांकडून घेण्यात येते. सदर औद्योगिक वसाहतीत १०.७२ एम.एल.डी.सांडपाण्याची निर्मित्ती होते. मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी उद्योगांकडून प्रक्रियेसाठी कमी येणा-या सांडपाण्याबद्दल महाराष्ट्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिका-यांना विचारणा केली असता त्यांनी नमुद केले की, उद्योगाचे सांडपाणी वाहून नेणा-या पाईप लाईनचे काम तीन टप्प्यामध्ये करण्यात येत आहे. यापैकी प्रथम टप्प्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे व द्वितीय टप्प्याचे काम डिसेंबर २०१५ अखेर पूर्ण करण्याबाबत अपेक्षित आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर ७-८ एम.एल.डी. इतके सांडपाणी प्रक्रियेसाठी सदर यंत्रणेकडे येणे अपेक्षित आहे. सदर यंत्रणेमध्ये अचानक (**Shock Load**) जास्तीचे सांडपाणी प्रक्रियेसाठी येत असल्यामुळे सी.ई.टी.पी.च्या सम्पला अडथळा येतो. यावर मा.सदस्य सचिव यांनी ज्या उद्योगांमध्ये एक लाख लिटर पाण्याचा वापर होतो, त्या उद्योगास ऑन लाईन फ्लो मिटर मिटर व डाटा लॉगर बसविण्याबाबतचे व पाणी वापरण्याचे नियोजन सादर करण्याबाबतचे निर्देश दिले. १७ वर्गीकरणातील समाविष्ट असणा-या उद्योगांनी यापूर्वी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार ऑन लाईन मॉनिटरींग सिस्टीम तीन महिन्यात बसविण्यात याव्यात. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिका-यांना सी.ई.टी.पी.च्या फेज-१,२,३, पाईप लाईन, सम्प इ. कामकाजाबाबत संपूर्ण कृती आराखडा १५ दिवसांच्या आत सादर करण्याबाबत आदेश दिले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वाळुज येथे असलेल्या पाझर तलाव पूर्णपणे निकामी करण्याबाबत जल सिंचन विभागास शासनातर्फे पत्राद्वारे कळविण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. महाराष्ट्र औद्योगिक विकास वाळुज वसाहतीच्या बाहेरील उद्योगांलादेखील कृती आराखडयामध्ये सामावून घेण्याबाबत सांगितले आहे.

बैठकीस उपस्थित असलेले औरंगाबाद महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांनी औरंगाबाद शहरातून निर्माण होणा-या जल व घनकच-याची प्रक्रिया व विल्हेवाट सद्य:स्थिती व प्रस्तावित उपाययोजनाबाबतची माहिती दिली. सद्य:स्थितीत महानगरपालिकेत निर्माण होणा-या ११० एम.एल.डी. सांडपाण्यापैकी फक्त ११.५ एम.एल.डी. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. महानगरपालिका औरंगाबाद यांनी इंटिग्रेटेड प्रकल्पांतर्गत केंद्र शासनाकडे २२२.५० एम.एल.डी.क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासंबधात प्रस्ताव सादर केला होता. त्यापैकी महानगरपालिकेने १६१ एम.एल.डी.चा एकच प्रक्रिया केंद्र एकाच ठिकाणी करावयाचे प्रस्तावित केले. यावर मा.प्रधान सचिव, तथा अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ व मा.सदस्य सचिव यांनी १६१ एम.एल.डी.च्या एस.टी.पी.बाबत असे सूचित केले की, सदर प्रस्ताव हा व्यवहारिक व तांत्रिकदृष्टया योग्य नसून, सदर प्रस्तावाबाबत पुनर्विचार करुन माडयुलर पध्दतीचा अवलंब करुन सदर प्रस्ताव, संपूर्ण माहिती व कृती आराखडा १५ दिवसांमध्ये सादर करण्याचे आदेश दिले. तसेच घनकचरा न जाळण्याबाबत व प्लास्टिक कॅरी बॅग (५० मायक्रॉनपेक्षा कमी) न वापरण्याबाबत सूचना देण्यात आल्या. घनकचरा व्यवस्थापन व विल्हेवाटबाबतचा प्रस्ताव १५ दिवसांत सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

मा.अध्यक्ष यांनी सरतेशेवटी औरंगाबाद अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत वरील झालेल्या चर्चेमध्ये कृती आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी मा.सदस्य सचिव यांच्या स्तरावर दर महिन्याच्या दुस-या गुरुवारी बैठक घेण्यात यावी तसेच दर तीन महिन्याला मा.अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येईल, याबाबत सूचित केले.

मा.अध्यक्ष व मा.सदस्य सचिव यांनी सूचित केली की, निर्देशांक कमीत-कमी करण्यासाठी आपल्या संबंधीत विभागाशी निगडित असलेल्या कृती आराखडयाबाबतच्या

उपाययोजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी व उपस्थितीत झालेल्या मुद्दांबाबत/करावयाच्या कार्यवाहीबाबत सद्य:स्थितीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क. | बैठकीत उपस्थितीत केलेले मुद्दे | कार्यवाही | संबंधीत विभाग |
|---|---|---|---|
| १ | वाळुज औद्योगिक क्षेत्रामध्ये असलेल्या सामुहिक सांडपाणी सयंत्रणेसंबंधी असलेल्या समस्या, दुस-या व तीस-या टप्प्यातील उद्योगाचे सांडपाणी वाहून नेणा-या कामाबाबत | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिका-यांना सी.ई.टी.पी.च्या फेज-१,२,३, पाईप लाईन, सम्प इ. कामकाजाबाबत संपूर्ण कृती आराखडा १५ दिवसांच्या आत सादर करण्याबाबत आदेश दिले. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| २. | सामुहिक सांडपाणी यंत्रणेमध्ये अचानक जास्तीचे सांडपाणी (Shock Load) प्रक्रियेसाठी येत असल्यामुळे सी.ई.टी.पी.च्या सम्पला अडथळा येत असल्याबाबत | मा.सदस्य सचिव यांनी ज्या उद्योगांमध्ये एक लाख लिटर औद्योगिक सांडपाण्याची निर्मित्ती होते, त्या उद्योगास ऑन लाईन फ्लो मिटर व डाटा लॉगर बसविण्याबाबतचे व पाणी वापरण्याच्या नियोजनाचे संकल्प एका महिन्यात सादर करण्याबाबतचे निर्देश दिले. | संबंधीत उद्योग/वाळुज उद्योग संघटना/ महाराष्ट्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ |
| ३ | १७ अतिप्रदूषित वर्गीकरणातील समाविष्ट असणा-या उद्योगांनी यापूर्वी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार ऑन लाईन मॉनिटरींग सिस्टीम बसविण्याबाबत | १७ अतिप्रदूषित वर्गीकरणातील समाविष्ट असणा-या उद्योगांनी उद्योगांनी यापूर्वी केंद्रीय प्रदूषण प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार ऑन लाईन मॉनिटरींग सिस्टीम तीन महिन्यात बसविण्यात याव्यात. | संबंधीत उद्योग/ म.प्र.नि.मंडळ. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वाळुज येथे असलेल्या पाझर तलाव पूर्णपणे निकामी करण्याबाबत | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वाळुज येथे असलेल्या पाझर तलाव पूर्णपणे निकामी करण्यात यावा. | जल सिंचन विभाग |
| ४ | औरंगाबाद शहरातून निर्माण होणा-या जल व घनकच-याची प्रक्रिया व विल्हेवाट व प्रस्तावित उपाययोजनाबाबत | मा.सदस्य सचिव यांनी वरील विषयाबाबतची संपूर्ण माहिती व कृती आराखडा १५ दिवसांमध्ये सादर करण्याचे आदेश दिले. | औरंगाबाद महानगरपालिका |
| ५ | महाराष्ट्र औद्योगिक विकास वाळुज वसाहतीच्या क्षेत्राबाहेरील उद्योगालादेखील कृती आराखडयामध्ये सामावून घेण्याबाबत | महाराष्ट्र औद्योगिक विकास वाळुज वसाहतीच्या क्षेत्राबाहेरील उद्योगालादेखील कृती आराखडयामध्ये सामावून घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या. | संबंधीत उद्योग/औद्योगिक उद्योग/औद्योगिक संघटना/महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/महाराष्ट्र प्रदूषण प्रदूषण नियंत्रण मंडळ |
| ६ | घनकचरा जाळण्याबाबत व प्लॉस्टिक बॅगच्या वापराबाबत(५० मायक्रॉनपेक्षा कमी ) न वापरण्याबाबत | घनकचरा न जाळण्याबाबत व प्लॉस्टिक बॅगच्या वापराबाबत (५० मायक्रॉनपेक्षा कमी ) न वापरण्याबाबत सूचना देण्यात आल्या. | औरंगाबाद महानगरपालिका |
| ७ | शहरातील व औद्योगिक परिसरातील रस्त्याचे कॉंक्रींटीकरण/डांबरीकरण व दुरुस्ती करताना धुळीचे प्रदूषणावर उपाययोजना करण्याबाबत | टँकरद्वारे पाण्याचा वापर फवारा फवारा पध्दतीने किमान दिवसातून ३-४ वेळा करण्यात यावा. | महानगरपालिका/महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | शहर व परिसरातील तसेच औद्योगिक परिसरातील निवासी, निवासी, व्यापारी संकुल व औद्योगिक प्रकल्प बांधताना धुळीचे प्रदूषण व चांगल्या पाण्याचा वापर कमी करण्याबाबत | प्रक्रियाकृत केलेले घरगुती सांडपाण्याचा पुनर्वापर हा विहित गुणवत्तेत आल्यानंतर आल्यानंतर त्याला बांधकामाकरिता वापर करावा. तसेच महानगरपालिकेने नवीन बांधकाम करताना त्या बांधकामाच्या ठिकाणी हवा रोधक भिंत तसेच ७ मिटर उंचीचे टिनाचे पत्रे बसवून, हवेची गुणवत्ता मर्यादित ठेवावी. | संबंधीत उद्योजक, महानगरपालिका/महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| ९ | औरंगाबाद शहरातील औद्योगिक औद्योगिक वसाहतीतील (वाळुज, (वाळुज, रेल्वे स्टेशन, शेंद्रा, चिखलठाणा )उद्योगांनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करण्याबाबत | औरंगाबाद शहरातील औद्योगिक वसाहतीतील उद्योगांनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत तीन महिन्यात करण्यात यावी. | उद्योग/म.प्र.नि.मंडळ/ |
| 10 | शहरातील रस्त्यांच्या बाजुने व रिकाम्या परिसरात तसेच औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांच्या बाजुला व उद्योगामधील रिकाम्या जागेत झाडे लावण्याबाबत | शहरातील रस्त्यांच्या बाजुने व रिकाम्या परिसरात तसेच औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांच्या बाजुला व उद्योगामधील रिकाम्या जागेत झाडे तीन महिन्यांच्या आत लावण्यात यावेत | महानगरपालिका/ औद्योगिक विकास महामंडळ/उद्योग व म.प्र.नि.मंडळ |

बैठकीस उपस्थितीतांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

-xxxx-

15/5/15